TITLE-CODE:- MAHMAR52789

# आपला मराठी टाइम्स

संपादक : अनिल राजाराम पवार कार्यकारी संपादक: मुकेश आर्मा देवेंद्र APLA MARATHI TIMES

वर्ष : १ ● अंक : २८ ● साप्ताहिक ● मुंबई ● भाषा : मराठी ● सोमवार : ८ ते १४ जुलै २०२४ ● पृष्ठ - ८ ● मुल्य : ६ रुपये

## तडजोड केली, तरच युती टिकते; उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे महायुतीच्या मेळाव्यात परखड मतप्रदर्शन

**मुंबई :** मी केवळ माझ्यापुरते पाहीन इतरांचे नाही, हा विचार महायुतीमध्ये योग्य नाही. कोणत्याही युतीमध्ये तडजोड आवश्यक असते, तशी भूमिका नसेल तर युती टिकत नाही, असे परखड मतप्रदर्शन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी षण्मुखानंद सभागृहात झालेल्या महायुतीच्या मेळाव्यात केले. विधानसभा निवडणुकीत महायुतीने लोकसभा निवडणुकीपेक्षा २० लाखाहून अधिक मते विधानसभा निवडणुकीत मिळविली, तर २०० हून अधिक जागा मिळवून महायुती सत्तेवर येईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. महायुतीत भक्कम एकजूट ठेवून गाफील न राहता विरोधकांच्या अपप्रचाराचा खंबीरपणे मुकाबला करावा आणि केंद्र व राज्य सरकारच्या योजना जनतेपर्यंत पोचवाव्यात, असे आवाहन




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि फडणवीस या तीनही नेत्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले. महायुतीतील पक्षांचे आमदार, खासदार व अन्य नेते मेळाव्यास उपस्थित होते. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या महायुतीच्या मेळाव्यात बोलताना फडणवीस यांनी महायुतीतील बोलघेवडे प्रवक्ते व नेत्यांनाही इशारा दिला. लोकसभा निवडणुकीत यशाने हुरळून गेलेले विरोधक विधानसभा निवडणुकीसाठी एकत्रित आहेत.

पण महायुतीमध्ये मतभेद असल्याचा अपप्रचार करण्यात येत असून त्याला महायुतीतील पक्षांमधील काही नेते व प्रवक्ते खतपाणी घालत आहेत. एकमेकांविरोधात बोलण्याची खुमखुमी काही नेत्यांमध्ये आहे. महायुतीतील ज्या नेत्यांना एकमेकांविरोधात बोलायचे असेल, त्यांनी बोलण्याआधी आपल्या नेत्यांची परवानगी घेऊनच बोलावे, असा सज्जड दम फडणवीस यांनी बोलघेवड्या नेत्यांना दिला. महायुती एकसंध आहे. विधानसभा निवडणुकीतील उमेदवारी आणि अन्य निर्णय वरिष्ठ नेते एकत्रितपणे घेतील. जे निर्णय पटणार नाहीत, त्यावर चार भिंतीआडच चर्चा व्हावी, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांना मोफत वीज कायम राहणार असून त्यादृष्टीने योग्य नियोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनी योजनेत ९ हजार मेगावॉट वीजनिर्मिती दीड वर्षात सुरू होईल आणि सध्या शेतकऱ्यांसाठी सात रुपये प्रति युनिट दराने घ्यावी लागत असलेली वीज तीन रुपयांपर्यंत मिळेल. वीज थकबाकीचे काय, असा प्रश्न उपस्थित केला जातो. पण आतापर्यंत थकबाकी वसूल केली नाही आणि नंतरही शेतकऱ्यांकडून वीजबिल थकबाकी वसूल करणार नाही, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली. केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदी केल्याने नाशिक, सोलापूर व अन्य काही भागात लोकसभा निवडणुकीत फटका बसला. त्यामुळे केंद्राने आता पुन्हा निर्यातबंदी करू नये आणि दूधभुकटी आयात करू नये, अशी विनंती पवार यांनी केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांना केली. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा करणार असल्याचे सांगितले.

पान ३ वर

## पुरवणी मागण्यांचे आकारमान विक्रमी ? विविध योजनांसाठी सुमारे एक लाख कोटींच्या मागण्या



**मुंबई :** सुमारे २० हजार कोटींची महसुली तूट तर सुमारे एक लाख कोटींची वित्तीय तूट असताना अर्थसंकल्पात घोषणा करण्यात आलेल्या सुमारे एक लाख कोटींच्या योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी येत्या आठवड्यात सादर करण्यात येणाऱ्या पुरवणी मागण्यांचे आकारमान विक्रमी होण्याची चिन्हे आहेत. सुमारे एक लाख कोटींच्या आसपास पुरवणी मागण्यांची जंत्री अंतिम करण्यात आल्याचे मंत्रालयातील सूत्रांकडून सांगण्यात आले. अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी पुरवणी मागण्या नेहमी मांडल्या जातात. पण यंदा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर झाल्यावर पुरवणी मागण्या मांडण्यात येणार आहेत. येत्या मंगळवारी विधिमंडळात मांडण्यात येणार्‍या पुरवणी मागण्यांचे आकारमान अधिकचे असेल, असेच संकेत देण्यात आले आहेत. २०२३-२४ या आर्थिक वर्षात महायुती सरकारने एक लाख कोटींच्या पुरवणी मागण्या वर्षभरात मांडल्या होत्या.

पान ३ वर

## ३२७ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त; अंडरवर्ल्डचा सहभाग, दाऊद इब्राहिमचा हस्तक मुख्य सूत्रधार

**भाईंदर :** देशभरात अमली पदार्थाची निर्मिती करून विक्री करणाऱ्या एका मोठ्या टोळीचा पर्दाफाश करण्यास मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाला मध्यवर्ती गुन्हे शाखेला यश आले आहे. एकूण ३२७ कोटीचा साठा जप्त करून १५ जणांना आता पर्यंत अटक करण्यात आली आहे. ही टोळी आंतरराष्ट्रीय दहशतवादी दाऊद इब्राहिमचा म्होरक्या सलीम डोळा चालवत असल्याचे निष्पन्न झाले आहे. लोकसभा निवडणूक आचारसंहिता कालावधीत पोलिसांकडून शहरात नाकाबंदी राबवण्यात येत होती. यावेळी १५ मे रोजी शोएब मेमन व निकोलस हे दोन व्यक्ती अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी मिरा भाईंदर मध्ये येत असल्याची गुप्त माहिती गुन्हे शाखा १ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अविराज कुराडे यांना मिळाली होती. त्यावरून पोलीसांनी घोडबंदर येथील चेना भागात सापळा रचून आरोपीना ताब्यात घेतले. यात आरोपीकडून दोन कोटी किंमतीचे जवळपास एक किलो एमडी ड्रग्स पोलिसांना मिळाले होते. सदर आरोपींची पोलीस चौकशी केली असता आरोपीना तेलंगणा येथून हे अमली पदार्थ आल्याचे माहिती समोर आली .त्यामुळे हा अमली पदार्थ साठा तयार करणाऱ्या टोळीला ताब्यात घेण्यासाठी पोलिसांचे एक पथक तेलंगणा येथील विकाराबाद जिल्ह्यात गेले. यातून नासिर उर्फ



बाबा शेख आणि दयानंद उर्फ दया माणिक या आरोपीना अटक करून २५ कोटी किंमतीचे एम. डी आणि कारखाना पोलिसांनी जप्त केला होता. यावेळी अधिक तपास केला असता अमली पदार्थाची मोठी टोळी सक्रिय असलेले पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यावरून वाराणसी, महाराष्ट्र , आणि गुजरात येथे शोध मोहीम राबवून अन्य आरोपींना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणात पैशाची देवाण-घेणाव व इतर गोष्टीमध्ये मुख्य सूत्रधार आंतरराष्ट्रीय दहशतवादी दाऊद इब्राहिमचा मोरक्या सलीम डोळा असल्याचे स्पष्ट झाले आहे.तर चौकशीअंती पोलिससांनी एकूण १५ आरोपीना अटक करून एकूण ३२७ किंमतीचे एम. डी जप्त केले. याशिवाय आरोपीकडून तीन पिस्तूल, एक रिवाल्वर आणि ३३ जिवंत काढत असे देखील हस्तगत करण्यात आले आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश कुऱ्हाडे व त्यांच्या पथकाने पार पाडली आहे.

अमली पदार्थ विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत असताना पैशाची देवाण-घेवाण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दहशतवादी दाऊद इब्राहिम चा मोरक्या सलीम डोळा हा गुजरातच्या सुरत येथील व्यापारी झुल्फीकार उर्फ मूर्तझा कोठारी मार्फत व्यवहार करत असल्याचे समोर आले. त्यामुळे पोलिसांनी कोठारीला ताब्यात घेऊन त्याकडून १० लाख रोख रक्कम जप्त केली आहे. तसेच ही रक्कम मुंबईच्या मुस्तफा फर्निचर वाला या अंगडिया (हवाला ) मार्फत पाठवत असल्याचे तपासात समोर आले आहे.

घटनाक्रम


# रवींद्र वायकरांचं प्रकरण हे राजकीय ब्लॅकमेलिंगचं, भूखंड घोटाळ्यात क्लीन चिट मिळताच काँग्रेस आक्रमक

**मुंबई :** अमोल कीर्तिकरांच्या विरोधात अवघ्या ४८ मतांनी जिंकलेले शिवसेना खासदार रवींद्र वायकर यांना मुंबई पोलिसांनी भूखंड घोटाळा प्रकरणात क्लीन चिट दिली आहे. जोगेश्वरी भूखंड घोटाळा प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेकडून न्यायालयात सी समरी रिपोर्ट दाखल करण्यात आला. या अहवालात मुंबई महापालिकेने वायकरांच्या विरोधात गैरसमजातून गुन्हा दाखल केल्याचं मुंबई पोलिसांनी म्हटलं आहे. तसंच रवींद्र वायकरांविरोधातले गुन्हे मागे घेतल्याचीही माहिती आहे. यानंतर काँग्रेस पक्ष आक्रमक झाला आहे. काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांनी पोस्ट लिहून राजकीय ब्लॅकमेलिंगचं आणखी एक उदाहरण म्हणजेच रवींद्र वायकर असं म्हटलं आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे) नेते रविंद्र वायकर यांच्याविरोधातील पोलीस तपास आता बंद करण्यात येत आहे. वायकर यांचे प्रकरण हे राज्यात गेले दहा वर्षे चाललेल्या राजकीय ब्लॅकमेलचे अजून एक उदाहरण होय. किरीट सोमय्यांनी आरोप करायचे.. तक्रार करायची:.मग तपास यंत्रणांचा ससेमिरा नंतर कुटुंबातील सदस्यांचा भयंकर छळ करुन भयभीत करायचे, मग भाजपाकडून पक्षात यायचा प्रस्ताव अन्यथा अजून छळाची धमकी, मग भाजपात किंवा भाजपाच्या सहकारी पक्षात पक्षप्रवेश नंतर यंत्रणांकडून क्लीन चिट. महाराष्ट्राचे राजकारण अत्यंत खालच्या स्तरावर नेण्याचे पातक भाजपाने केलं आहे. किरीट सोमय्या या व्यक्तीमत्वाने राजकारण कलंकित केलं आहे. जनतेने लोकसभा निवडणुकीत बऱ्यापैकी सफाई केली. परंतु अजूनही ती अर्धवट अवस्थेत आहे. विधानसभा



निवडणुकीत या हीन राजकारणाचा व वॉशिंग मशीनचा अंत जनतेच्या राजकारणाच्या सफाई अभियानातून होईल. अशी पोस्ट सचिन सावंत यांनी एक्स या समाजमाध्यमावर केली आहे. रवींद्र वायकरांविरोधातलं प्रकरण हे गैरसमजुतीतून आणि अपुऱ्या माहितीच्या आधारे दाखल करण्यात आलं होतं. जोगेश्वरी येथील आलिशान हॉटेलच्या बांधकाम प्रकरणी रवींद्र वायकर अडचणींत आले होते. मात्र त्यांच्या विरोधात मुंबई महापालिकेने दिलेली तक्रार अपूर्ण माहितीच्या आधारे दिली गेली. या प्रकरणात रवींद्र वायकर यांच्या पत्नी मनिषा आणि त्यांचे भागीदार आसू नेहलानी, राज लालचंदानी, प्रिथपाल बिंद्रा आणि आर्किटेक्ट अरुण दुबे यांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला होता. मुंबईतील जोगेश्वरीच्या मजासवाडी भागात १३ हजार ६७४ चौरस फुटांचा भूखंड मुंबई महापालिकेच्या मालकीचा आहे. हा भूखंड मैदानासाठी आणि रूग्णालयासाठी राखीव ठेवण्यात आला होता. या भूखंडाची किंमत ५०० कोटींच्या घरात आहे. या राखीव भूखंडावर रवींद्र वायकर यांनी पंचतारांकित हॉटेल बांधलं असा आरोप झाला. विशेष बाब म्हणजे या बांधकामासाठी वायकर यांनी मुंबई महापालिकेकडून परवानगी घेतली नव्हती, असा त्यांच्यावर आरोप आहे. या प्रकरणी रविंद्र वायकर यांची चौकशी सुरु आहे. चौकशीसाठी हजर राहण्यासंदर्भात नोटीस देण्यात आली होती. मात्र वायकर या चौकशीला हजर राहिले नाहीत. त्यानंतर आता ईडीकडून वायकर यांच्या घरावर धाड टाकण्यात आली. आता मुंबई पोलिसांनी या प्रकरणी सी समरी रिपोर्ट सादर केला आहे. ज्यामध्ये मुंबई महापालिकेने गैरसमजातून आणि अपूर्ण माहितीच्या आधारे तक्रार दाखल केल्याचं म्हटलं आहे. इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त दिलं आहे.

## परीक्षांमध्ये गैरप्रकार करणाऱ्यांना तीन ते पाच वर्षे तुरुंगवास; पेपरफुटी,अन्य बाबी रोखण्यासाठी सरकारच्या उपाययोजना



**मुंबई :** शासकीय सेवा व अन्य स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी आणि गैरप्रकारांना चाप लावण्यासाठी राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली असून अशी कृत्ये करणाऱ्यांना तीन ते पाच वर्षे तुरुंगवास आणि १० लाख रुपयांपर्यंत दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबतचे विधेयक विधानसभेत शुक्रवारी सादर केले. पैसे घेऊन प्रश्नपत्रिकेविषयी कोणतीही माहिती उघड करणे, त्याविषयीची माहिती इतरांना देणे, अनधिकृतपणे परीक्षा केंद्रात प्रवेश करणे, आदी कोणत्याही प्रकारे पेपरफुटी किंवा अन्य गैरप्रकार करणाऱ्यांवर या विधेयकातील तरतुदींनुसार कारवाई होऊ शकणार आहे. परीक्षा घेणाऱ्या किंवा प्रक्रियेत सहभागी असलेल्या व्यक्ती, संस्था किंवा कंपन्या यातील कर्मचारी किंवा कोणीही अशा गैरप्रकारांमध्ये सहभागी असतील, त्यांच्यावरही कठोर कारवाईची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. गेल्या काही काळात पेपरफुटी, सामूहिक कॉपी व अन्य अनेक गैरप्रकार उघडकीस आले होते. या पार्श्वभूमीवर सरकारने कठोर उपाययोजना करण्यासाठी हे विधेयक सादर केले आहे.

## शेतकऱ्यांसाठी मोफत वीज योजना कायमचीच ; उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही

**मुंबई :** शेतकऱ्यांना साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांना मोफत वीज योजना निवडणुकीपुरती नसून ती कायम सुरू राहील, अशी ग्वाही देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, आदिवासी, मागासवर्गीय, अल्पसंख्याक आदी सर्व समाजघटकांसाठी भरीव आर्थिक तरतुदी केल्याचे शुक्रवारी विधानसभेत स्पष्ट केले. तसेच बिहार व आंध्र प्रदेशच्या धर्तीवर केंद्राकडून राज्यालाही भरीव मदत मिळविण्याचे प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



अर्थसंकल्पावरील चर्चेच्या उत्तरात अजित पवार यांनी, विरोधकांकडून अपप्रचार सुरू असल्याने निवडणुकीपर्यंत अर्थसंकल्पातील तरतुदींविषयीची माहिती लोकांच्या मनावर वारंवार बिंबविली जाईल. महाराष्ट्राची आर्थिक क्षमता प्रचंड असून महसुली व राजकोषीय तूट अधिक दिसत असली तरी ती वित्तीय निकषांच्या मर्यादेतच असल्याचे पवार यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांसाठीच्या विविध योजनांसाठी करोडो रुपयांच्या तरतुदी असून सरकार त्यांच्या पाठीशी असल्याने त्यांनी आत्महत्येचा विचार करू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

अल्पसंख्याकांसाठी मौलाना आझाद महामंडळासाठी ५०० कोटी रुपयांची शासकीय हमी देऊन आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. जनता एखादेवेळी फसेल, पण प्रत्येक वेळी अपप्रचार यशस्वी होणार नाही. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबाबतही विरोधकांकडून अपप्रचार सुरू आहे. महिलांनी कोणालाही दमडी देऊ नये, निकष पूर्ण करणाऱ्या महिलांना योजनेचा लाभ मिळेल. हा अजित पवार यांचा वादा आहे, असे पवार यांनी नमूद केले.

बिहार आणि आंध्र प्रदेशला केंद्राकडून विशेष दर्जा किंवा साहाय्य मिळणार असल्याचे ऐकवित आहे. केंद्र व राज्यात एकाच विचारांचे सरकार असल्याने राज्यालाही केंद्राकडून मदत मिळावी, असे प्रयत्न केले जातील, असे पवार यांनी सांगितले. राज्याचे कर्ज सात लाख ८२ हजार कोटी रुपयांवर गेल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात येत आहे. ही वाढ १०.६७ टक्के आहे. मी कर्जाचे समर्थन करीत नाही. पण वित्तीय निकषांनुसार ते २५ टक्क्यांपेक्षा कमी आवश्यक असून या आर्थिक वर्षात ते १८.३५ टक्के असेल. राज्य उत्पन्नाच्या ते २.३२ टक्के असून केंद्राच्या तीन टक्के कमाल मर्यादेच्या आतच आहे.

मुंबई–गोवा रस्ता अनेक वर्षे रखडला असल्याची कबुली देत २ बॉम्बे टू गोवा चित्रपटासारखा एखादा चित्रपट किंवा पुस्तक लिहावे लागेल, अशी परिस्थिती असल्याचा टोला पवार यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना उद्देशून लगावला. कित्येकांनी आम्ही आमदार–खासदार झाल्यावर हा रस्ता पुरा करू, असे जनतेला निवडणुकीत सांगितले व निवडून आले. पण हा रस्ता काही झाला नाही. पण केंद्रीय रस्तेवाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी हे काम लवकर पूर्ण करण्याची ग्वाही दिली आहे, याकडे पवार यांनी लक्ष वेधले.

बारामतीपासून काटेवाडीपर्यंत वारकरी व पालखीबरोबर जाणार.

१७ शहरांमध्ये १० हजार पिंक रिक्षा, मागणीनुसार जिल्हा व तालुकास्तरापर्यंत विस्तार.

# अग्रवाल नगरी मधील ४१ अनधिकृत इमारती पाडण्याचे न्यायालयाचे आदेश; पालिकेकडून घरे खाली करण्याच्या नोटिसा, रहिवाशी हवालदील

**वसई:** नालासोपारा पूर्वेकडील अग्रवाल नगरी मधील ४१ अनधिकृत इमारती पाडण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने वसई विरार महापालिकेला दिले आहेत. त्यानुसार पालिकेने येथील रहिवाशांना घरे खाली करण्याच्या नोटिसा बजावल्या आहेत. खासगी जागा बळकावून तसेच पालिकेच्या आरक्षित भूखंडावर अतिक्रमण करून या इमारती बांधण्यात आल्या आहेत. नालासोपारा पूर्वेच्या अग्रवाल नगरी येथे भूमापन क्रमांक (सर्व्हे नंबर) २२ ते ३० पर्यंतचा ३० एकरचा मोठा भूखंड होता. त्यातील काही भूखंड खासगी तर काही भूखंड हा कचराभूमी (डंपिंग ग्राऊंड) आणि सांडपाणी प्रकल्पासाठी (एसटीपी) आरक्षित होता. २००६ मध्ये ही जमीन माजी नगरसेवक सीताराम गुप्ता व त्यांचे पुतणे अरुण गुप्ता यांनी बळकावून जमिनीवर बेकायदा इमारती बांधण्यास सुरुवात केली होती. बनावट बांधकाम परवानगी (सीसी) आणि भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) बनवून तसेच इतर कागदपत्रांच्या सहाय्याने या अनधिकृत ईमारती बांधण्यात आल्या आहेत. २०१० ते २०१२ या कालावधीत येथे ४१ अनधिकृत



इमारती उभ्या राहिल्या होत्या. याविरोधात जमीन मालक अजय शर्मा यांनी उच्च न्यायालयात धाव घेत जनहीत याचिका दाखल केली होती. या प्रकरणी न्यायालयाने निर्णय देताना ४१ इमारतींच्या रहिवाशांना घरे खाली करण्याचे आदेश महापालिकेला दिले आहेत. त्यानुसार महापालिकेने या इमारती मधील रहिवाशांना घरे खाली करण्याच्या नोटिसा बजावल्या आहेत. या प्रकरणात माजी नगरसवेक सिताराम गुप्ता, अरूण गुप्ता यांच्यासह चौघा जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले होते सिताराम गुप्ता याला अटकही करण्यात आली होती. आम्ही मागील १५ वर्षांपासून याप्रकरणी न्यायासाठी लढा देत आहोत. आमची जमीन बळकावली तेव्हापासून सतत तक्रारी करत होतो. खोट्या कागदपत्रांच्या आधारे अनधिकृत इमारती उभ्या रहात होत्या तेव्हा देखील पालिकेने दुर्लक्ष केले. न्यायालयाचा हा निर्णय दिलासा देणारा आहे असे याचिकाकर्ते अजय शर्मा यांनी सांगितले. या ३० एकर भूखंडापैकी आमची १० एकर जागा हडप करून तेथे अनधिकृत इमारती बनविण्यात आल्याचे शर्मा यांनी सांगितले. या इमारती अनधिकृत असून रहिवाशांची फसवणूक करून घरे विकण्यात आली आहे. येथील ४१ इमारतींमध्ये २ हजारांहून अधिक नागरिक राहतात. आता उच्च न्यायालयाने घरी खाली करण्याची नोटीस पाठविल्याने रहिवाशी हवादील झाले आहे. भर पावसात कारवाई झाली तर करायचे काय असा प्रश्न त्यांच्यापुढे पडला आहे.

## पुरवणी मागण्यांचे आकारमान विक्रमी ?...

पान १ वरुन

त्यापेक्षा अधिकच्या पुरवणी मागण्या यंदा सादर केल्या जातील. विधानसभा निवडणुकीसाठी सरकारी तिजोरी लोकप्रिय घोषणांसाठी वापरली जाणार आहे. अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ४६ हजार कोटी रुपये वर्षभरात दिले जातील, असे जाहीर करण्यात आले. अर्थसंकल्पात १० हजार कोटींची तरतूद केली आहे. उर्वरित ३६ हजार कोटी पुरवणी मागण्यांमधून दिले जाणार आहेत. तीन मोफत सिलिंडरसाठी दीड हजार कोटी, विद्यार्थिनींचे पदवीपर्यंतच्या मोफत शिक्षणासाठी अडीच हजार कोटी, विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनाकरिता १० हजार कोटी, महावितरणला विजेसाठी निधीची तरतूद करण्यात येणार आहे. निवडणुकीच्या तोंडावर मतदारांना खूश करण्याकरिता आमदारांना काही प्रमाणात निधी देण्याची योजना आहे. महायुतीच्या आमदारांना निधी देण्याची मूळ योजना होती. पण त्यातून विरोधकांना निवडणुकीच्या तोंडावर आयते कोलीत मिळू शकते. यामुळेच सत्ताधाऱ्यांना झुकते माप देताना विरोधकांच्या मतदारसंघांमध्येही निधीची तरतूद करण्यात येणार आहे. लोकसभा निवडणुकीत फटका बसल्याने सत्ताधारी महायुतीचे नेते अधिक सावध झाले आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची प्रभावी अंमलबजावणी निवडणुकीपूर्वी करून महिला मतदारांची मते मिळविण्याची योजना आहे. यासाठीच पुढील दोन महिन्यांत जास्तीत जास्त महिलांना या योजनेचा लाभ कसा मिळेल या दृष्टीने महायुतीच्या वतीने नियोजन करण्यात येत आहे. यंदा निवडणूक वर्ष असल्याने लोकप्रिय घोषणांवरच अधिक भर देण्यात आला आहे. यातून विकास कामांवरील निधीत कपात करण्यात आली आहे. यंदा एक लाख कोटींपेक्षा अधिक कर्ज उभारण्याची योजना असल्याचे अर्थसंकल्पात स्पष्ट करण्यात आले आहे. अर्थसंकल्पात घोषणा करण्यात आलेल्या योजनांसाठी निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. केवळ फसव्या घोषणा आहेत.– पृथ्वीराज चव्हाण, माजी मुख्यमंत्री

## तडजोड केली, तरच युती टिकते...

पान १ वरुन

महायुतीचे वरिष्ठ नेते उमेदवारीचा निर्णय घेतील, पण अन्य इच्छुकांना उमेदवारी न मिळाल्यास त्या नेत्यांनी वेगळा विचार करू नये, असे आवाहन पवार यांनी केले. महायुतीची बदनामी होईल, अशी कोणतीही गोष्ट कोणत्याही नेत्याने करू नये. जो कोणी असे करेल, तो कोणत्याही पक्षाचा असला, तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल, असा इशारा पवार यांनी दिला. महायुती सरकारला दोन वर्षे पूर्ण झाली. हे सरकार सत्तेवर आल्यापासून ते पडण्याची भाकिते विरोधक करीत होते. पण सरकार टिकले व विरोधकांचे चेहरे पडले. अर्थसंकल्पातही सर्व समाजघटकांसाठी एक लाख कोटी रुपयांच्या अनेक योजना राज्य सरकारने जाहीर केल्या असून विरोधकांना बोलण्यासाठी मुद्देच मिळाले नाहीत. राज्यात १२० सिंचन प्रकल्पांच्या कामांमुळे सुमारे आठ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येईल. अपप्रचार करून विरोधकांनी लोकसभा निवडणुकीत यश मिळविले, पण आता विधानसभा निवडणुकीत हे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत, असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

## वसईत ७१ अनधिकृत शाळा; ५८ अनधिकृत शाळांवर गुन्हे दाखल


**वसई:** मागील काही वर्षांपासून वसई विरार भागात अनधिकृत शाळा उभारण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. यावर्षीच्या सर्वेक्षणात वसई तालुक्यात ७१ शाळा अनधिकृत असल्याचे आढळून आले आहे. यातील ५८ शाळांच्या विरोधात कारवाई करीत गुन्हे दाखल केले आहेत.वसई विरार शहराचे नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. विशेषत: पूर्व पट्टीच्या भागात मोठ्या प्रमाणात चाळी उभारल्या गेल्या आहेत. अशा विविध ठिकाणच्या भागात मागील काही वर्षांपासून शहरात अनधिकृत शाळा सुरू करण्याचे प्रकार सुरू आहेत. शहरातील विविध भागांमध्ये शिक्षण विभागाची परवानगी न घेताच अनधिकृत शाळा सुरू आहेत. काही शाळा तर दाटीवाटीच्या परिसरात अनधिकृत बांधकाम असलेल्या खोल्यांमध्ये भरविल्या जात आहेत. तर काही ठिकाणी शाळांना इंग्रजी नावे देऊन त्या शाळा कॉन्व्हेंट असल्याचे भासवून पालक व विद्यार्थ्यांची फसवणूक केली जाऊ लागली आहे. या अनधिकृत शाळांना रोखण्यासाठी शिक्षण विभागाने त्यांचे सर्वेक्षण करण्याचे काम हाती घेतले होते. पेल्हार, मालजीपाडा, दहिसर, कामण,कळंब , विरार वालीव , बोळींज , माणिकपूर केंद्रानिहाय केलेल्या सर्वेक्षणात अजूनही शहरात ७१ अनधिकृत शाळा असल्याचे आढळून आले आहे. यातील ५८ शाळांच्या विरोधात शिक्षण विभागाने गुन्हे दाखल केले आहेत.

गुन्हे दाखल झाल्यानंतर ही शहरात काही शाळा सुरू आहेत.

अनधिकृत शाळांच्या वाढत्या प्रकारामुळे विद्यार्थी व पालक यांची फसवणूक होत आहे. असे प्रकार टाळण्यासाठी शहरातील ज्या अधिकृत शाळा आहे व ज्यांना शासनाने मान्यता दिली आहे. अशा सर्व शाळांनी मान्यता पत्र शाळेच्या दर्शनी भागात लावा जेणेकरून शाळेची माहिती पालक विद्यार्थ्यांना समजेल अशा सूचना ही शिक्षण विभागाने केल्या आहेत. याशिवाय शिक्षण विभागाकडूनही अनधिकृत शाळेत प्रवेश घेऊ नये याबाबत आवाहन करण्यात येत आहे.अनधिकृत शाळांचे सर्वेक्षण व त्यानंतर नियमानुसार कारवाई करण्याचे काम सुरू आहे.पालकांनी सुद्धा ज्या शाळेला शासनाची मान्यता आहे अशा ठिकाणीच मुलांचा प्रवेश घ्यावा.

## पार्टीत दारू कमी पडली आणि २५ वर्षीय बर्थडे बॉयला मित्रांनीच संपवलं

**कल्याण:** कल्याणमधील चिंचपाडा गावात पार्टी सुरू असताना दारू कमी पडली म्हणून चक्क एकाला जीव गमवावा लागल्याची धक्कादायक घटना समोर येत आहे. २५ वा वाढदिवस साजरा करणाऱ्या एका व्यक्तीला त्याच्या मित्रांनी चौथ्या मजल्यावरील बाल्कनीतून फेकून दिल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे समजतेय. ही घटना २७ जून रोजी घडली होती, ज्यात कार्तिक वायाळ याचा मृत्यू झाला आहे. आरोपींमध्ये त्यांचे मित्र, नीलेश क्षीरसागर, सागर काळे आणि धीरज यादव यांचा समावेश आहे. हिंदुस्थान टाईम्सने पोलिसांच्या अहवालाचा हवाला देत दिलेल्या वृत्तानुसार, रात्री उशिरा दारू संपली तेव्हा जे चौघे मद्यधुंद अवस्थेतच होते. दारू न मिळाल्याने त्यांच्यात वाद सुरू झाला. यामुळे




अपमानास्पद वाटल्याने कार्तिकने नीलेशच्या डोक्यावर दारूची बाटली फोडली आणि तिन्ही मित्रांना घरातून बाहेर निघून जायला सांगितलं. यामुळे तणाव वाढला आणि कार्तिक थेट भांडणानंतर झोपायला गेला. भांडणात कार्तिक झोपायला गेल्यावर निलेश संतापला होता. सागर व धीरजच्या मदतीने निलेश कार्तिकच्या खोलीत शिरला आणि त्याला बाल्कनीत ओढून घेऊन गेला. या तिघांनी ढकलताच कार्तिक बाल्कनीतुन खाली पडला. वरून पाहताच कार्तिक रक्ताच्या थारोळ्यात पडलेला या तिघांना दिसून आला, खाली जाऊन पाहताच कार्तिकला गंभीर दुखापत झाल्याचे तिघांच्या लक्षात आले. ही अवस्था लक्षात येताच कार्तिकच्या कुटुंबीयांनी पोलिसांना याबाबत माहिती दिली. पण स्वत:चा बचाव करण्यासाठी तोपर्यंत निलेश, सागर व धीरजने एक वेगळीच कहाणी रचली. कार्तिकने निलेशच्या डोक्यात बॉटल मारल्याने त्याला दुखापत झाली आणि म्हणून अन्य दोन मित्र निलेशला घेऊन रुग्णालयात गेले होते. कार्तिक कसा खाली पडला याविषयी त्यांना काहीच माहित नाही असाही दावा त्यांनी केला. मात्र कार्तिकच्या कुटुंबाने पोलिसांनी अधिक तपास करण्यासाठी विनंती केली व त्यातच पुढे वाढदिवसाच्या पार्टीत घडलेल्या घटनांचा खरा क्रम उघड झाला. सद्य माहितीनुसार, उल्हासनगर पोलिसांनी आता निलेश, सागर आणि धीरज यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

# मंत्रालयात नोकरी लावतो सांगून कल्याणमधील चार जणांची फसवणूक

**कल्याण :** कल्याण पूर्वेत जिम्मीबाग भागात राहत असलेल्या एका ४७ वर्षाच्या महिलेसह इतर तीन जणांची दोन भामट्यांनी आम्ही तुम्हाला मंत्रालयात शिपाई म्हणून नोकरीला लावतो, असे सांगून त्यांच्याकडून गेल्या चार वर्षाच्या काळात चाळीस लाख रूपये उकळले. पैसे देऊन चार वर्ष झाले तरी नोकरी नाहीच, पण दिलेले पैसेही परत मिळत नसल्याने फसवणूक झालेल्या नागरिकांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. मुक्ता लक्ष्मण चांदेलकर (४७), मनोज यशवंत देवळेकर, प्रशांत संभाजी चांदेलकर, उमेश विरजी वेगडा असे फसवणूक झालेल्या तक्रारदारांची नावे आहेत. तक्रारदार मुक्ता चांदेलकर कल्याण पूर्वेतील जिम्मीबाग भागात राहतात. त्या झेरॉक्स आणि टंकलेखन केंद्र चालवितात. या माध्यमातून मिळणाऱ्या पैशातून त्या कुटुंबीयांची उपजीविका करतात. घनश्याम हिरामण धडे, जयवंत पष्टे आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी सांगितले, आरोपी घनश्याम धडे याने आपली मंत्रालयात ओळख आहे. आपण




अनेकांना मंत्रालयात नोकरीला लावले आहे, असे तक्रारदार मुक्ता चांदेलकर यांच्यासह तीन जणांना चार वर्षापूर्वी सांगितले. या बदल्यात वरिष्ठ अधिकाऱ्यांना, मध्यस्थांना पैसे द्यावे लागतील, असेही त्याने सांगितले. मुक्ता यांच्यासह इतरांनी पैसे भरून नोकरीमिळविण्याची तयारी केली. मागील चार वर्षाच्या काळात धडे आणि पष्टे यांनी मुक्ता यांच्याकडून ११ लाख ६५ हजार, मनोज देवळेकर यांच्याकडून १८ लाख १२ हजार, प्रशांत यांच्याकडून पाच लाख सहा हजार, उमेश यांच्याकडून चार लाख ८८ हजार रूपये उकळले. अशाप्रकारे चार जणांकडून आरोपींनी ३९ लाख ७९ हजार रूपये वसूल केले. पैसे घेतल्यानंतर तक्रारदार आरोपींकडे नियुक्तीचे पत्र देण्याची मागणी करू लागले. आरोपी त्यांना साहेब बाहेर आहेत. ते सुट्टीवर आहेत, अशी खोटी कारणे देऊन वेळकाढूपणा करू लागले. अशी कारणे देत आरोपींनी चार वर्ष लोटली. आम्हाला नोकरी मिळणार नसेल तर आमचे पैसे परत करा, असा तगादा तक्रारदारांनी लावला. त्यानंतर आरोपींनी तक्रारदारांच्या संपर्काला प्रतिसाद देणे बंद केले. आरोपींनी त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. ते कोठेच आढळून आले नाहीत. आरोपींनी आपली फसवणूक केल्याचे लक्षात आल्यावर मुक्ता चांदेलकर यांच्या पुढाकाराने तक्रारदारांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.

# अस्वस्थ गणेश नाईक यांचे थेट मुख्यमंत्र्यांनाच आव्हान


**नवी मुंबई :** राज्यात सत्ता असूनही नवी मुंबईतील घरच्या मैदानातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर झुंजावे लागत असल्याची भावना तीव्र होऊ लागल्याने भाजपचे ठाणे जिल्ह्यातील प्रभावी नेते गणेश नाईक यांनी सिडको आणि नगरविकास विभागाच्या माध्यमातून थेट मुख्यमंत्र्यांवरच निशाणा साधल्याचे बुधवारी विधिमंडळात पाहायला मिळाले. राज्यात सत्ता आल्यानंतरही मंत्रीपदापासून दूर ठेवले गेल्याने नाईक दुखावले गेले आहेत. लोकसभा निवडणुकीत हातातोंडाशी आलेला मुलाच्या उमेदवारीचा घास मुख्यमंत्र्यांनी ऐन वेळी हिरावून घेतला. आहेत. नाईकांचा एक कट्टर विरोधक तर महापालिकेतील २७० कोटींची कामे आपल्याकडे आहेत हे टिपेच्या सुरात नवी मुंबईत सांगत असतो. ही परिस्थिती बदलायची असेल तर यंदाची विधानसभा निवडणूक नाईकांसाठी करो वा मरो प्रकारची आहे. बेलापूर मतदारसंघात नाईकांचे सुपुत्र संदीप नाईक त्या दृष्टीने कामालाही लागले आहेत. स्वपक्षाचा विरोध, उमेदवारी देताना भाजपचे नियम, घरच्या मैदानातच वाढते विरोधक आणि मुख्यमंत्र्यांकडूनच कोंडी होत असल्याच्या भावनेमुळे अस्वस्थ झालेल्या नाईकांनी विधानसभेत दिलेला आवाज आगामी संघर्षाची नांदी मानली जात आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रीपद आल्याने मुंबई महानगर प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांचे समर्थक आणि निकटवर्तीयांचा मुक्त वावर सुरू झाला आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मोक्याच्या पदांवर पाठविण्यात येणारे अधिकारी, निर्णय प्रक्रियेत



सिडको, नवी मुंबई महापालिका, एमआयडीसी यांसारख्या नाईकांच्या एके काळच्या सत्तासंस्थांवर सध्या मुख्यमंत्र्यांची सद्दी चालते. महापालिकेतील कंत्राटी कामे, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, महत्त्वाचे निर्णय ठाण्यातून घेतले जात असल्याची नाईक समर्थकांची तक्रार आहे. या अस्वस्थतेला विधिमंडळात वाट मोकळी करून देत नाईकांनी मुख्यमंत्र्यांच्या विभागावर टीकेची झोड उठविल्याने ठाणे जिल्ह्यातील राजकारणात नाईक विरुद्ध शिंदे हे चित्र पुन्हा ठसठशीतपणे पुढे आले आहे. नवी मुंबईतील दोन्ही विधानसभा मतदारसंघांत नाईक कुटुंबीयांना उमेदवारी मिळावी यासाठी नाईकांचा आग्रह आहे. यापूर्वी सलग दहा वर्षे स्वत: नाईक आणि संदीप नाईक यांनी बेलापूर, ऐरोली विधानसभा क्षेत्राचे प्रतिनिधित्व केले आहे. मागील दहा वर्षांत मात्र नाईकांना दुय्यम भूमिका घ्यावी लागली आहे. या काळात त्यांच्या विरोधकांची ताकद आणि संख्याही वाढली आहे. मुख्यमंत्र्यांच्या कृपेने नाईकांचे कडवे विरोधक आर्थिकदृष्ट्या बलशाली झाले महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या मोहऱ्यांच्या चाली या ठाण्याहून ठरविल्या जातात. नवी मुंबई पालिकेवर १९९५ पासून नाईकांची सत्ता आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यापासून शिपायापर्यंत अनेकांनी नाईकांच्या कृपेने एके काळी अच्छे दिन अनुभवले आहेत. हे चित्र गेल्या पाच वर्षांत पूर्णपणे पालटले आहे. आपल्या समर्थकांची साधी साधी कामे करून घेण्यासाठी देखील नाईकांना महापालिका मुख्यालयात जोडे झिजवावे लागतात. भाजपच्या शहरातील आमदार मंदा म्हात्रे आणि नाईकांमध्ये विस्तवही जात नाही. मुख्यमंत्र्यांकडून मंदाताईंसाठी निधीची पोतडी खुली करून दिली जाते. त्या म्हणतील ती कामे मुख्यमंत्री करतात. हेदेखील नाईक समर्थकांच्या अस्वस्थतेचे मोठे कारण आहे.

# ठाणे स्थानकातील ३४ कॅमेरे बंद, निगराणी नसल्याने रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

**ठाणे :** प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ठाणे रेल्वे स्थानकात फलाटांवर लावण्यात आलेल्या १७० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी ३४ कॅमेरे गेले अनेक आठवडे बंद असल्याची बाब उघडकीस आली आहे. सीसीटीव्ही कॅमेरे नसलेल्या भागात कोणतीही दुर्घटना, अपघात वा गैरप्रकार झाल्यास याचे चित्रीकरण मिळवण्यात पोलिसांना अडचणी येण्याची शक्यता आहे. दीड वर्षांपूर्वी लोहमार्ग पोलिसांनी रेल्वे प्रशासनाकडे स्थानकात ५० सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची मागणी केली होती. तीही अद्याप पूर्ण करण्यात आलेली नाही. याबाबत मध्य रेल्वेच्या जनसंपर्क विभागाशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही. ठाणे स्थानकात रोज सुमारे सात लाख प्रवासी ये-जा करतात. उपनगरीय रेल्वेगाड्यांसह रोज अडीचशेहून अधिक लांब पल्ल्याच्या गाड्या सुटतात. ठाणे स्थानक कायम वर्दळीचे असते. गर्दीच्या वेळी खिसेकापू, मोबाइल



चोरांपासून सावध राहण्याचे आवाहन पोलीस नेहमीच करीत असतात. अशा घटना घडल्यास आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांना सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमधील चित्रीकरणाचा उपयोग होतो. शिवाय गर्दीत अनेकदा अपघातही घडतात. अनेकदा प्रवाशांमध्ये हाणामारीचे प्रसंग घडतात. कधीकधी तिकीट तपासणीसांशी हुज्जत घालण्याचे प्रकार घडतात. त्यांच्यावर हल्ला करून काही जण पळून जातात. महिलांशी गैरकृत्य केल्याच्या घटनाही अनेकदा निदर्शनास येतात. या सर्व गोष्टींवर देखरेख ठेवण्यासाठी स्थानकात सद्या:स्थितीत १७० सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. तर स्थानकाबाहेरील परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस आणि पालिकेतर्फे सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. मात्र, रेल्वेच्या उदासीन कारभारामुळे स्थानक सद्यास्थितीत पूर्णपणे सीसीटीव्हीच्या कक्षेत आलेले नाही. यामुळे भविष्यात कॅमेरे नसलेल्या भागात कोणतीही दुर्घटना, अपघात अथवा गैरप्रकार झाल्यास आरोपींचा शोध घेणे कठीण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. स्थानकात १७० कॅमेरे आहेत. यापैकी ३४ कॅमेरे बंद आहेत. पुलांची उभारणी, छत दुरुस्तीमुळे कॅमेर काढून टाकण्यात आले आहेत. इतर काही ठिकाणी यांत्रिकी बिघाडामुळे कॅमेरे बंद आहेत. ठाणे रेल्वे स्थानकातील गर्दीवर लक्ष ठेवण्यासाठी तसेच अनुचित प्रकार टाळण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असले तरी या कॅमेऱ्यांची संख्या अपुरी आहे. अधिकच्या ५० कॅमेऱ्यांची मागणी लोहमार्ग पोलीस दीड वर्षे करीत आहेत. सध्या १९ कॅमेऱ्यांना मंजुरी मिळाली आहे. ते अद्याप मिळालेले नाहीत.

# ६ लाख रुपयांचा एमडी जप्त, एकाला अटक

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील एपीएमसी परिसरात अमली पदार्थ विक्री करणाऱ्या एका आरोपीस अटक करण्यात आले असून त्याच्या कडून ६० ग्रॅम वजनाचा ६ लाख रुपयांचा एमडी (मेफेड्रॉन) हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. आरोपीला अटक केले आहे. अश्फाक अस्लम मुकादम असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. मुकादम हा एपीएमसी परिसरात अमली पदार्थ विक्री करण्यास येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नीरज चौधरी यांना मिळाली होती. खबरीने दिलेल्या



माहितीनुसार उपप्रादेशिक परिवहन कार्यालय नजीक शालिमार हॉटेल परिसरात सहायक पोलीस निरीक्षक सचिन कोकरे, श्रीकांत नायडु, पोलीस हवालदार रमेश तायडे, पोलीस नाईक अंकुश म्हात्रे, राकेश आहिरे, या पथकाने सदर ठिकाणी सापळा लावला. यात आरोपी मुकादम अडकला. त्याला ताब्यात घेत त्याची झडती घेतली असता त्याच्या कडून ६० ग्रॅम भुकटी (पावडर) आढळून आली. त्याची तपासणी केली असता ती भुकटी एमडी (मेफेड्रॉन) हा अमली पदार्थ असल्याचे समोर आले. मुकादम याची चौकशी केली आता सदर अमली पदार्थ विक्री करण्यास तो आला होता अशी माहिती समोर आली आहे. त्याला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक श्रीकांत नायडु, हे करीत आहेत.

# कोलशेत खाडी भरावाप्रकरणाची होणार चौकशी ; वनमंत्र्यांच्या आदेशामुळे अधिकारी चौकशीच्या फेऱ्यात

**ठाणे :** येथील बाळकुम, कोलशेत भागातील खाडीकिनारी परिसरातील खारफुटीवर मोठ्या प्रमाणात राडारोड्याचा भराव टाकून त्या जागेवर अतिक्रमण करण्यात आले आहे. हा मुद्दा भाजपचे आमदार संजय केळकर यांनी विधानसभा अधिवेशनात उपस्थित करताच त्याची गंभीर दखल घेऊन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी खाडी भरावप्रकरणी चौकशी समिती नेमून कारवाई करण्याचे आश्वासन दिले. यामुळे पालिका, जिल्हा प्रशासन आणि कांदळवन विभागातील अधिकारी चौकशीच्या फेऱ्यात सापडण्याची चिन्हे आहेत. ठाणे शहराला ३२ कि.मीचा खाडीकिनारा लाभला आहे. या खाडीकिनारी भागात गेल्या काही वर्षापासून अतिक्रमण वाढू लागले आहे. बाळकुम आणि कोलशेत भागातील खाडीकिनारी परिसरातील खारफुटीवर मोठ्या प्रमाणात राडारोड्याचा भराव टाकून त्या जागेवर अतिक्रमण करण्यात येत आहे. या नव्या बेटामुळे मोठ्या प्रमाणात खारफुटी नष्ठ झाली आहे. त्याकडे ठाणे महापालिका तसेच जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने भविष्यात पुरपरिस्थिती निर्माण होण्याची भिती व्यक्त होत आहे. ठाणे महापालिका प्रशासनाने भराव रोखण्यासाठी चर खोदून कांदळवनाच्या दिशेने जाणारे मार्ग वाहतूकीसाठी बंद केले होते. असे असले तरी याप्रकरणी मात्र अद्याप कुणावरही कारवाई करण्यात आलेली नाही. असे असतानाच, ठाणे शहरातील भाजपचे आमदार संजय केळकर यांनी कोलशेत, बाळकुम खाडी किनारी भागातील राडारोड्याच्या भरावाचा मुद्दा विधानसभेत प्रश्नउत्तराच्या तासात उपस्थित केला. कोलशेत आणि बाळकुम भागात खाडीतील कांदळवन मातीभरावाने उद्धवस्त झाली असून येथे मैदाने तयार झाली आहेत. या आधी कांदळवन तोडून त्यावर बांधकामेही झाली आहेत. नागरीकरणामुळे येथे पूर्वी येणारे फ्लेमिंगोसारखे विदेशी पक्षी देखील येईनासे झाले आहेत तर निसर्गाचाही ऱ्हास झाला असल्याचे केळकर यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणले. याबाबत वन, महसूल आणि महापालिका एकमेकांकडे बोट दाखवून कारवाई टाळत आहेत. त्यामुळे भूमाफिया आणि तथाकथित विकासकांचे फावले असून काँक्रीटची जंगले वाढत आहेत. या तीन पैकी एकाच विभागाकडे जबाबदारी निश्चित करण्यात यावी अथवा तिन्ही विभागांनी एकत्रित कारवाई करावी, अशी मागणी केळकर यांनी केली. यावर उत्तर देताना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी काही ठिकाणी अधिकाऱ्यांना हाताशी धरून कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याची कबुली दिली. या प्रकरणी आर्थिक दंड आकारण्याऐवजी शिक्षा भोगण्याची तरतूद करण्याची गरज व्यक्त केली. ठाण्यात कांदळवन उद्धवस्त करून त्यावर बांधकामे होत असतील तर आमदार संजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणी चौकशी समिती नेमून संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



# तळोजा-खोणी रस्त्यावर प्रवाश्याला पोलीस सांगून दिवसाढवळ्या लुटले

**डोंबिवली :** पलावा गृहप्रकल्पालगतच्या तळोजा-खोणी रस्त्यावर प्रवाशांना लुटण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. या रस्त्यावरून यापुढे जायचे की नाही असा प्रश्न प्रवाशांना पडू लागला आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये ओला उबर चालक, दुचाकी स्वार, खासगी मोटार चालक यांना भामट्यांनी लुटल्याच्या घटना ताज्या असताना बुधवारी सकाळी नऊ वाजता खोणी भागातील एका नागरिकाला दोन भामट्यांनी लुटून त्यांच्या जवळील एक लाखाची सोनसाखळी घेऊन पलायन केले आहे. भगवान रामा काळोखे (५८, रा. पागऱ्याचापाडा, खोणी, पलावा) असे लुटलेल्या प्रवाशाचे नाव आहे. ३५ वयोगटातील दोन तरुणांनी हा लुटमारीचा प्रकार तळोजा-खोणी रस्त्यावर केला आहे. कल्याण, बदलापूर, डोंबिवली परिसरातील बहुतांशी नोकरदार, व्यावसायिक तळोजा-खोणी रस्त्याने पनवेल, नवी मुंबई भागात जातात. सर्वाधिक वर्दळीचा हा रस्ता आहे. तरीही या भागात दिवसा, रात्री लुटमारीच्या घटना वाढल्या आहेत. भगवान काळोखे हे पागऱ्याचापाडा येथील बाजारातून मटण खरेदी करून दुचाकीवरून बुधवारी सकाळी नऊ वाजता घरी येत होते. त्यावेळी त्यांना दुचाकीवरून दोन इसम येत असल्याचे दिसले. त्या इसमांनी काळोखे यांना थांबण्यास सांगितले. त्यांची आणि वाहनाची कागदपत्रे मागण्यास सुरुवात केली. आम्ही पोलीस आहोत. आम्ही वाहनांची तपासणी सुरू केली आहे असे काळोखे यांना सांगितले. दुचाकीवरून फिरताना गळ्यात मौल्यवान ऐवज घालून कधीही फिरायचे नाही असा सल्ला भगवान काळोखे यांना तोतया पोलिसांनी दिला. काळोखे यांच्या गळ्यातील पाच तोळ्याची एक लाख रुपये किमतीची सोनसाखळी तोतया पोलिसांनी स्वत: काढून ती कागदात गुंडाळली. ती काळोखे यांच्या खिशात ठेवत आहोत, असा अभास तयार केला. त्या बदल्यात तोतया पोलिसांनी स्वत:जवळील कागदात गुंडाळलेले दगड काळोखे यांच्या खिशात ठेवले. पोलिसांनी आपल्या खिशात आपली सोनसाखळी ठेवली आहे असे काळोखे यांना वाटले. दोन्ही भामट्यांनी काळोखे यांना जाण्यास सांगितले व स्वत:ही तेथून निघून गेले. घरी गेल्यावर काळोखे यांना आपल्या खिशात सोनसाखळी ऐवजी दगड ठेवले असल्याचे दिसले. तात्काळ ते पुन्हा दुचाकीने तळोजा खोणी रस्त्यावर आले. तोपर्यंत दोन्ही तोतया पोलीस पळून गेले होते. याप्रकरणी काळोखे यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.




# महिनाभरात २१ नवजात बालकांचा मृत्यू; बालकांचे वजन कमी असल्याचा कळवा रुग्णालय प्रशासनाचा दावा

**ठाणे :** महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात महिन्याभरात २१ नवजात बालके मरण पावल्याची माहिती समोर आली आहे. या नवजात बालकांचे वजन कमी असल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचा दावा रुग्णालय प्रशासनाने केला आहे. कळवा रुग्णालयात लहान मुलांसाठी अतिदक्षता विभागात ३० खाटा आहेत. जून महिन्यात ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील ५१२ महिला प्रसूतीसाठी रुग्णालयात दाखल झाल्या होत्या. त्यातील ९० महिलांची प्रसूतीसाठी नोंदणी करण्यात आली होती. एकूण २९४ महिलांची सिझेरियन प्रसूती झाली. या प्रसूती झालेल्या महिलांच्या आठ नवजात बालकांचा ४८ तासांत मृत्यू झाला. ठाणे ग्रामीण भागातील व पालघर जिल्ह्यातील गंभीर परिस्थिती असलेल्या महिला जून महिन्यात प्रसूतीसाठी दाखल झाल्या होत्या. या महिलांच्या ९० नवजात बालकांचे वजन एक किलो वजनापेक्षा कमी होते. त्यामुळे मृत्यू झालेल्या २१ बालकांपैकी १९ बालके शहराबाहेरील होते. त्यांच्यावर उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला असल्याचा दावा रुग्णालय प्रशासनाने केला आहे. मागील वर्षी ऑगस्ट महिन्यात याच रुग्णालयात एकाच दिवशी १८ रुग्णांचा मृत्यू झाला होता. त्या घटनेनंतर जाग आलेल्या पालिका प्रशासनाने रुग्णालयाचा ताण कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या होत्या. आता एका महिन्यात २१ नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आल्याने प्रशासनाच्या नवीन उपाययोजना फोल ठरल्या का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या प्रकरणाचा अहवाल रुग्णालय प्रशासनाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राकेश बारोट यांच्याकडून मागविण्यात आला आहे. मृत्यू पावलेल्या नवजात बालकांचे वजन हे दीड किलोपेक्षा कमी असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. परंतु, आता याची चौकशी केली जाईल आणि याचा अहवाल सभागृहसमोर सादर केला जाईल. उमेश बिरारी, उपायुक्त, ठाणे महापालिका.




# दागिने पाहण्यासाठी आलेल्या महिलांनी आठ लाख रुपयांचे दागिने केले लंपास

**ठाणे :** भिवंडीतील ब्राह्मणआळी भागात असलेल्या एका सराफाच्या दुकानात बुरखा घातलेल्या दोन महिला दागिने पाहण्याच्या बहाण्याने आल्या आणि त्यांनी दुकानातील कर्मचाऱ्याची दिशाभूल करत आठ लाख रुपयांचे दागिने लंपास केल्याची घटना बुधवारी उघडकीस आली आहे. याप्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भिवंडीत ब्राह्मणआळी भागात मंछालाल जसाजी चौहान (५२) यांचे स्वत:चे सोन्याच्या दागिन्याचे दुकान आहे. या दुकानात सोमवारी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास काळ्या रंगाचा बुरखा घातलेल्या दोन अज्ञात महिला सोन्याचे दागिने पाहण्याच्या बहाण्याने आल्या होत्या. दुकानातील कर्मचारी भगवानराम हा त्या महिलांना दागिने दाखवत होता. परंतु, या महिलांनी भगवानराम या कर्मचाऱ्याची दिशाभूल करत, एका ट्रे मधील आठ लाख रुपये किंमतीचे २०० नग सोन्याचे दागिने लबाडीने चोरी केले. याप्रकरणी मंछालाल जसाजी चौहान यांनी या दोन महिलांविरोधात भोईवाडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. या तक्रारीवरुन या महिलांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पोलीसांचा पुढील तपास सुरु आहे.



## संपादकीय

संपादक : अनिल राजाराम पवार

# युद्धाआधीची लढाई

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका आता फारशा दूर नाहीत. लोकसभेच्या निवडणुकांमध्ये महाराष्ट्राने जो निकाल दिला तो भाजपप्रणित सत्ताधारी आघाडीला खडबडून जागे करणारा होता आणि महाविकास आघाडीच्या स्वप्नांमध्ये नवी पालवी फुलविणारा होता. या पार्श्वभूमीवर पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या चार निवडणुकांमध्ये सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनाही समसमान जागा मिळाल्या. मुंबईतील शिक्षक आणि पदवीधर या दोन्ही जागा जिंकून उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने आपली ताकद दाखवून दिली. मुंबई शिक्षक मतदारसंघ भाजपच्या ताब्यातून जो गेला तो काही परत यायला तयार नाही. मुंबईतून अनिल परब आणि ज. मो. अभ्यंकर हे शिवसेनेचे दोन्ही तगडे उमेदवार परिषदेत गेले. कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपचे विद्यमान आमदार निरंजन डावखरे यांनी मेहनतीने चांगला विजय मिळवला; तर नाशिक शिक्षक मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे किशोर दराडे यांनी बाजी मारली. केवळ पदवीधर आणि शिक्षक यांच्यासाठीच विधान परिषदेत जागा कशासाठी आणि पदवीधर मतदारांची दरवेळी वेगळी नोंदणी कशासाठी, अशा तर्कशुद्ध प्रश्नांना काहीही उत्तरे न शोधता परिषदांच्या निवडणुका होत आल्या आहेत. राज्यपालनियुक्त जागांचा कसा मनमानी वापर होतो, हे तर दिसतेच आहे. अशा या अंदाधुंदीत यंदा उमेदवारांनी प्रचंड खर्च केल्याच्या ज्या बातम्या आल्या; त्या शरम वाटणाऱ्या होत्या. परिषदेत शिक्षक आमदार म्हणून जाऊ इच्छिणाऱ्यांनी मतदार शिक्षकांना पैसे वाटावेत, किमती वस्तू द्याव्यात, दागिने द्यावेत... याहून लोकशाही आणि शिक्षण अशा दोन्ही व्यवस्थांची एकदम होणारी दुसरी क्रूर चेष्टा नसेल. शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांमध्ये विजय मिळविण्यासाठी जे इतकी गुंतवणूक करतात; ते त्यातून पुढे सहा वर्षे मिळणाऱ्या परताव्याची गणिते कशी बांधत असतील, हे वेगळे सांगायला नको. आपल्या हक्काच्या मतांची बेरीज व बेगमी आधीच करून ठेवायची आणि त्या मतदारांना मतदानाला आणायचे, असे शिक्षक व पदवी मतदारसंघांचे गणित असते. मुंबईत अनिल परब यांना हे गणित जमण्याची खात्री असल्याने आणि भाजपचा कमी वजनी गटातील उमेदवार असल्यामुळे चंद्रकांत पाटील यांनी परब यांना निकालांच्या आधीच चॉकलेट भरविले. आता परिषदेत आलेले हे दोन सत्ताधारी आणि दोन विरोधी आमदार स्वत: किती चॉकलेट्स खातात आणि मतदारांसाठी बडीशेपेच्या गोळ्या तरी ठेवतात का, हे कळेलच. मुळात इतर सार्वत्रिक निवडणुकांसाठी असणारी खर्चाची मर्यादा या निवडणुकांसाठी असते का आणि तशी ती असेल तर ती पाळली जाण्यासाठी निवडणूक आयोग नेमके काय करतो, हे कळीचे सवाल आहेत. शिक्षक व पदवीधर मतदारसंघांतील उमेदवार कोट्यवधी रुपयांचा खर्च कसा काय करतात आणि मतदार शिक्षकांच्या श्रीमंती जेवणावळी कशा काय उठतात ? या निवडणुकांमध्ये बोगस पदवीधर आणि बोगस शिक्षक मतदार म्हणून घुसले आहेत का, याचाही एकदा कसून तपास केला पाहिजे. त्यासाठी खरे तर उच्च न्यायालयानेच लक्ष घालायला हवे. मुळात विधान परिषद या वरिष्ठ खर्चिक सभागृहाचे महाराष्ट्रात काही प्रयोजन उरले आहे का, या मूळ प्रश्नाचीच गंभीर चर्चा करायला हवी. शिक्षक आणि पदवीधर निवडणुकांचे हे कवित्व संपते ना संपते तोच विधानसभेतून विधान परिषदेत पाठविण्याच्या आमदारांच्या निवडीची प्रक्रिया सुरू झाली आहे. या ११ जागांची निवडणूक बिनविरोध होणार नाही, हे मंगळवारी स्पष्ट झाले. आता कुणी अर्ज मागे घेतले नाहीत तर इथे वेगळेच हिशेब मांडले जातील. या निवडणुकीत प्रत्येक उमेदवाराला २३ मतांचा कोटा आवश्यक असेल. शेतकरी कामगार पक्षाचे नेते जयंत पाटील यांना शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पाठिंबा दिला आहे आणि उद्धव ठाकरे यांचे सहायक पण सर्व पक्षांत मित्र असणारे मिलिंद नार्वेकर हे ही रिंगणात उतरले आहेत. सत्ताधारी आणि विरोधक यांनी ही निवडणूक म्हणजे ताकद दाखविण्याची संधी मानली तर या निवडणुकीतही एकेका मतासाठी प्रचंड मोठा घोडेबाजार होईल, यात शंका नाही. पंकजा मुंडे यांचे लागोपाठ दोन पराभव झाले. फडणवीस सरकार गेल्यापासून त्यांचे समाधानकारक राजकीय पुनर्वसन आजतागायत झालेले नाही. आता त्या परिषदेत गेल्यानंतर त्यांना सहा वर्षांसाठी लोकप्रतिनिधित्व मिळेलच, सोबत अन्यायाची भावनाही दूर होईल. शेकापचे जयंत पाटील मला शरद पवार यांनी शब्द दिला आहे, असे सांगत आहेत. तो खरा ठरायचा तर निवडणूक बिनविरोधच व्हायला हवी. ११ जागा आणि १२ उमेदवार अशी स्थिती राहिली तर शेवटचा उमेदवार युतीचा उडतो की आघाडीचा; याची मोठीच चुरस होईल. प्राधान्यक्रम मतदान पद्धतीमुळे मतमोजणीत दर फेरीमागे गुंतागुंत वाढत जाते. यंदा विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व गदारोळ आणि दंगामस्ती होणार आहे. त्याची चुणूक या युद्धाआधीच्या लढाईत मतदारांना दाखविण्याची तयारी दोन्हीकडे सुरू आहे.

# विजयी मिरवणुकीत आठ लाख क्रिकेटप्रेमी, अपेक्षेच्या तिप्पट गर्दी ; पोलीस, रेल्वे पोलिसांची तारांबळ




भारतीय संघाच्या विजयी मिरवणुकीत सुमारे सात ते आठ लाख क्रिकेटप्रेमी सहभागी झाल्यामुळे बंदोबस्ताला असलेल्या पोलिसांची प्रचंड दमछाक झाली. मोठया क्रिकेटप्रेमी रेल्वेने सीएसएमटी आणि चर्चगेट, मरिन लाईन्स रेल्वे स्थानकांवर दाखल झाल्याने रेल्वे पोलिसांची तारांबळ उडाली होती. दक्षिण मुंबईत वाढलेल्या गर्दीचा लोंढा आवरण्यासाठी आणि गर्दी पांगविण्यासाठी रेल्वे पोलिसांचा अतिरिक्त फौजफाटा मागवावा लागला. रेल्वे पोलिसांच्या सतर्कतेमुळे रेल्वे मार्गावर कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. नरिमन पॉईंट ते वानखेडे स्टेडियम दरम्यानच्या रस्त्यावर क्रिकेटप्रेमी दिसत होते. मरिन ड्राईव्ह परिसरात प्रचंड गर्दी झाली होती. सुमारे ७ ते ८ लाख क्रिकेटप्रेमी या मिरवणुकीत सहभागी झाले होते, असा अंदाज रेल्वे पोलिसातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. रेल्वे पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी २००७ साली टी-२० विश्वचषकाच्या विजयी मिरवणुकीचा अभ्यास केला. यावेळी अधिक गर्दी होण्याची शक्यता होती. त्यानुसार नियोजन करून १०० ते १५० सुरक्षा रक्षक बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले होते. मात्र, गुरुवारी दुपारी ३.३० वाजेनंतर क्रिकेटप्रेमींची गर्दी प्रचंड प्रमाणात वाढली. नियोजित केलेल्या अंदाजापेक्षा तिप्पट गर्दी वाढल्याने, राज्य राखीव पोलीस दल, शीघ्र कृती दल, दंगल नियंत्रण पोलीस यांना पाचारण करण्यात आले. १०० गृहरक्षक, ५० रेल्वे पोलीस अधिकारी आणि रेल्वे सुरक्षा बलाचे १०० अधिकारी, कर्मचारी तैनात केले होते. तसेच चर्चगेटमधील चिंचोळे प्रवेशद्वार बंद करून, फक्त मर्यादीत प्रवेशद्वार खुले ठेवण्यात आले होते. त्यामुळे गर्दीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले, अशी माहिती रेल्वे पोलिसाचे वरिष्ट अधिकर्याने सांगितले. मरिन ड्राइव्ह परिसरात रस्त्यावर राहणारी एक २२ वर्षीय गर्भवती महिला किरकोळ जखमी झाली. या महिलेला प्रथम सेंट जॉर्जेस रुग्णालयात व नंतर कामा रुग्णालयात आणण्यात आले. या महिलेवर उपचार करण्यात आले. तिला उपचारानंतर घरी सोडण्यात आल्याची माहिती कामा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. तुषार पालवे यांनी दिली. चर्चगेट रेल्वे स्थानक, वानखेडे स्टेडियम, मरिन ड्राईव्ह आणि नरिमन पॉईंट परिसरात चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. मात्र, या गर्दीचा फटका चाहत्यांनाच बसला. या विजयोत्सवात तब्बल ६० मोबाइल गहाळ झाल्याची नोंद मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात झाली. तर मोबाइल गहाळ झाल्याच्या ४ तक्रारी ऑनलाइन पद्धतीने करण्यात आल्या असून या तक्रारींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच, पोलिसांना १० ते १२ मोबाइल रस्त्यावर पडलेले सापडल्यानंतर त्यातील क्रमांकावर संपर्क साधून संबंधितांना ते मोबाइल परत केले. गुरुवारी रात्री ८.३० ते रात्री ९.३० दरम्यान गर्दीचा लोंढा चर्चगेट रेल्वे स्थानकाकडे वळत होता. यावेळी पोलिसांनी दोरीच्या साहा□याने क्रिकेटप्रेमींची गर्दी विभाजित केली. मात्र चर्चगेट रेल्वे स्थानकालगत पायऱ्यावरून एक तरुणी घसरून पडली. तिला तातडीने १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेत नेऊन उपचार करण्यात आले. तर, चर्नी रोड येथून लोकल सुटल्यानंतर अर्णव रांगले (१८) याने धावत्या लोकल बाहेर हात काढला. त्याच्या हाताला बाहेरील खांबाचा जोरदार फटका बसला. रेल्वे पोलिसांनी त्याला तत्काळ जीटी रुग्णालयात दाखल केले. गर्दीत १० पेक्षा अधिक अल्पवयीन मुले हरवली होती, त्यानंतर पोलिसांनी अल्पवयीन मुलांच्या पालकांचा शोध घेऊन त्यांच्याकडे ती सुपूर्द केली. विश्वचषक विजयी मिरवणुकीत बहुसंख्य क्रिकेटप्रेमी रेल्वे मार्गाने आले होते. त्यामुळे मध्य आणि पश्चिम रेल्वेवर सुमारे आठ लाख तिकीटधारक प्रवासी एका दिवसात वाढल्याची नोंद झाली आहे. गेल्या गुरुवारी मध्य रेल्वेवरून १२ लाख ०६ हजार ९६० प्रवाशांनी प्रवास केला होता. तर, विश्वचषक विजयी मिरवणुकीच्या निमित्ताने गुरुवारी, ४ जुलै मध्य रेल्वेवरून १३ लाख ७६ हजार ७५३ जणांनी प्रवास केला. यात सुमारे १ लाख ६९ हजार ७९३ प्रवासी वाढले. तर, पश्चिम रेल्वेवरून दैनंदिन सरासरी ८.५० लाख प्रवासी प्रवास करतात. मात्र, गुरुवारी १५ लाखांहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला. त्यामुळे सुमारे ६ लाखांहून अधिक प्रवाशांची संख्या वाढली, अशी माहिती मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली. यासह लाखो पासधारक प्रवाशांनी विश्वचषक विजयी मिरवणूक पाहण्यासाठी आले होते, अशी माहिती पश्चिम रेल्वेच्या वरिष्ट अधिकाऱ्याने दिली. स्वागतयात्रेदरम्यान चाहत्यांनी केलेल्या प्रचंड गर्दीमुळे झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये १९ हून अधिक जण जखमी झाले. जखमी झालेल्या नागरिकांपैकी जी.टी. रुग्णालयात सर्वाधिक ११ जणांवर उपचार करण्यात आले. गर्दीमुळे श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्यामुळे काही जणांना रुग्णालयात दाखल करावे लागले. तर काहींना किरकोळ दुखापती झाल्या होत्या. उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आल्याची माहिती जी.टी. रुग्णालयाचे अधिष्टाता डॉ. जितेंद्र संकपाल यांनी दिली. वृत्तवाहिनीचे छायाचित्रणकार सुनील वर्मा (३०) गर्दीमध्ये पडले. त्यांच्या पायाला दुखापत झाल्यामुळे त्यांना सेंट जॉर्जेस रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार करून त्यांना रात्री घरी पाठविण्यात आले. नायर रुग्णालयात दोघांना उपचारासाठी आणण्यात आले होते. तसेच पायाला मार लागल्याने चार व्यक्तींना बॉम्बे रुग्णालयामध्ये आणण्यात आले होते. या चारही व्यक्तींचे पाय फ्रॅक्चर झाले होते. त्यांच्यावर उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आल्याचे बॉम्बे रुग्णालयाने सांगितले. मरिन ड्राईव्हच्या शेजारीच असलेल्या सैफी रुग्णालयातही काही रुग्णांना दाखल करण्यात आले होते.

# ठाण्यात मालिकांच्या चित्रीकरण बनावट परवानगीचे पत्र, पत्रावर पोलीस उपायुक्ताची बनावट स्वाक्षरी

**ठाणे :** घोडबंदर परिसरात दुरचित्रवाहीनीवरील मालिकांच्या चित्रीकरणासाठी एका महिला पोलिस कर्मचाऱ्याने पोलिस उपायुक्तांच्या स्वाक्षरीने बनावट परवानगी पत्र तयार करून दिल्याची बाब उघडकीस आली असून यासाठी त्या दोन ते चार हजार रुपये घेत असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी त्या महिला पोलिस कर्मचारी विरोधात कासारवडवली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिला अद्याप अटक करण्यात आलेली नसून तिच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. ज्योती अनुसे असे यातील निलंबित महिला पोलिस कर्मचारीचे नाव असून तिची पाच महिन्यांपुर्वी चितळसर पोलिस ठाण्यात नेमणुक झाली. यापुर्वी ती ठाणे पोलिस आयुक्तालयातील पोलिस उपायुक्त परिमंडळ पाच (वागळे इस्टेट) कार्यालयात कार्यरत होती. घोडबंदर येथील बोरिवडे येथील रस्त्यावर एका मराठी वाहिनीवरील मालिकेचे चित्रीकरण सुरु होते. वागळे इस्टेट पोलिस उपायुक्त कार्यालयातून अशा मालिकांना चित्रकरणासाठी परवानगी देण्यात येते. या विभागात पोलिस शिपाई सागर ठाकरे हे काम करतात. त्यांनी




बोरिवडे येथे सुरू असलेल्या चित्रीकरणाबाबत मालिका प्रोडक्शन व्यवस्थापक शंतनु तळकर यांच्याकडे परवानगीची विचारणा केली. त्यावेळी त्यांनी मोबाईलमध्ये असलेले पोलिसांच्या परवानगीचे पत्र दाखविले. या पत्रावर पोलिस उपायुक्त कार्यालयाचा शिक्का, पोलिस उपायुक्त अमरसिंह जाधव यांची स्वाक्षरी होती. परंतु आपल्या विभागामार्फत असे कोणतेच परवानगी पत्र देण्यात आलेले नसल्याची बाब सागर ठाकरे यांच्या निदर्शनास आली. यामुळे त्यांनी याबाबत तळकर यांच्याकडे अधिक चौकशी केली असता, ज्योती अनुसे यांनी ही परवानगी दिल्याची माहिती समोर आली. या परवानगीसाठी कोणताही अर्ज केला नव्हता. अनुसे यांना केवळ फोनवरून कळविले असता, त्यांनी व्हॉट्सपवर परवानगी पत्र पाठविली असून यापुर्वीही त्यांनी असे परवानगी पत्र दिलेले आहे. प्रत्येक चित्रीकरणाच्या परवानगीसाठी अनुसे यांना गुगल पे द्वारे दोन ते तीन हजार रुपये दिले आहेत, अशी माहिती तळकर यांच्या चौकशीतून समोर आली. याप्रकरणी सागर ठाकरे यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे कासारवडवली पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात पोलिस उपायुक्त अमरसिंह जाधव यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या वृत्तास दुजोरा देत अनुसे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचे सांगितले.

## ठाणे महापालिकेतील पाच अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल, उपायुक्त मनिष जोशी यांच्यासह इतर पाचजणांचा समावेश, उपायुक्त जोशी यांनी आरोप फेटाळून लावले




**ठाणे :** ठाणे महापालिकेचे उपायुक्त मनिष जोशी यांच्यासह पाच जणांवर ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने न्यायालयाच्या आदेशानंतर गुन्हा दाखल केला आहे. दहा वर्षांपुर्वी बनावट आणि चुकीचे दस्ताऐवज तयार करून त्याच्या अभिलेखात नोंदी करत त्याचा खोट्या गुन्ह्यात अडकविण्यासाठी गैरवापर केल्याचा आरोप या पाचजणांवर आहे. दरम्यान, उपायुक्त जोशी यांनी मात्र हे आरोप फेटाळून लावत त्याविरोधात उच्च न्यायालयात धाव घेणार असल्याचे स्पष्ट केले. ठाणे महापालिका उपायुक्त मनिष जोशी, कळवा प्रभाग समितीचे प्रभाग अधिकारी सुरेश शिवलाल राजपुत, कनिष्ठ अभियंता रविंद्र दत्तात्रय कासार, मुख्य प्रशासकीय कार्यालय अधिकारी बाळू हनुमंत पिचड, उथळसर प्रभाग समितीचे तत्कलीन कर्मचारी गगनसिंग दानसिंग थापा या पाचजणांवर विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. या पाचजणांवर गुन्हा दाखल व्हावा यासाठी तक्रारदाराने न्यायालयात २०१३ रोजी दाद मागितली होती. त्यावर न्यायालयाने सीआरपीसी १५६ (३) अन्वये गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. यानुसार ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तक्रारदाराची तक्रार नोंदवून घेऊन त्याआधारे पाचजणांवर गुन्हा दाखल केला आहे. या पाचजणांनी स्वत:च्या आर्थिक फायद्याकरिता कायद्यामधील तरतुदीची जाणीवपुर्वक व हेतुपरस्पर अवज्ञा करून खोटे, बनावट आणि चुकीचे दस्ताऐवज तयार केले. या दस्ताऐवजाच्या शासकीय अभिलेखात नोंदी केल्या. तसेच हे दस्ताऐवज समान उद्देश साध्य करण्याकरिता संगनमताने कट रचून न्यायालयीन अभिलेखात पुराव्याकामी दाखल करून कायद्याने माहिती देणे बंधनकारक असताना सुद्धा जाणीवपुर्वक खोटी माहिती देऊन तक्रारदारांना नुकसान पोहचविण्याच्या दृष्टीने आणि तक्रारदारांना खोट्या गुन्ह्यात अडकविण्याचा गैर उद्देशाने पदाच दुरूपयोग करत खोटी तक्रार दाखल करून गुन्हेगारी गैरवर्तन केले, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. याप्रकरणी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिक्षक सुनिल लोखंडे यांच्याशी संपर्क साधला असता, न्यायालयाच्या आदेशानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणाचा तपास सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तक्रारदाराने केलेले आरोप चुकीचे आहेत. दहा वर्षांपुर्वी तक्रारदाराने इमारतीत बेकायदा वाढीव बांधकाम केल्याची तक्रार इमारतीमधील रहिवाशांनी केली होती. त्याआधारे नोटीस देऊनही त्यावर उत्तर मिळत नसल्यामुळे तक्रारदारावर एमआरटीपीची कारवाई करण्यात आली होती. इमारतीमधील रहिवाशांच्या तक्रारीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली असल्यामुळे यात खोटे दस्ताऐवज तयार करणाचा प्रश्नच येत नाही. याप्रकरणात पालिकेने केलेल्या चौकशीत आम्ही निर्दोष आढळून आला होता आणि तसा अहवाल पालिकेने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दिला होता. तक्रारदाराने न्यायालयाची दिशाभुल केल्याने हा गुन्हा दाखल झाला असून हा गुन्हा रद्द व्हावा यासाठी आम्ही उच्च न्यायालयात धाव घेणार आहेत, अशी प्रतिक्रिया उपायुक्त मनिष जोशी यांनी दिली.

## डोंबिवलीतील डिलक्स दारू विक्री ; दुकानाला बंदची नोटीस ; देवीचापाडा येथील दारूचा अड्डा पोलिसांकडून बंद

**डोंबिवली :** डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाजवळील पाटकर रस्त्यावरील डिलक्स दारू विक्री दुकानासमोरच ग्राहक दारू पिऊन धिंगाणा घालत होते. सर्वाधिक वर्दळीच्या रस्त्यावर हा प्रकार अनेक वर्ष सुरू होता. महिला वर्गाला या रस्त्यावरून जाताना त्रास होत होता. याप्रकरणी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्याकडे अनेक महिलांनी तक्रारी केल्या होत्या. या तक्रारींच्या अनुषंगाने आयुक्त डॉ. जाखड यांनी अधिकाऱ्यांना संबंधित दारू विक्रेता आणि उघड्यावर दारू पिऊन धिंगाणा घालणाऱ्यांवर कारवाईचे आदेश मंगळवारी दिले होते. आयुक्त डॉ. जाखड यांच्या आदेशावरून परिमंडळ उपायुक्त रमेश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली फ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार, ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत, साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर आणि रामनगर पोलीस ठाण्याचे पोलीस यांनी मंगळवारी रात्री अचानक डोंबिवली पूर्वेतील डिलक्स दारू विक्री दुकानासमोर उघड्यावर दारू पिण्यास बसलेल्या, या ग्राहकांना खाद्य पदार्थ पुरविणाऱ्या हातगाडींवरील विक्रेत्यांना कारवाई केली. उघड्यावर दारू पिण्यासाठी ग्राहकांनी दुकाना समोरील बाजुला कट्टे केले होते. या कट्ट्यावर ग्राहक मंगळवारी रात्री आठ वाजता दारू पिण्यास बसले असताना रामनगर पोलिसांनी ग्राहकांना प्रसाद देऊन



त्यांना तेथून पिटाळून लावले. या ग्राहकांना अंडी, बुरजी पाव, इतर तिखट पदार्थ पुरविणाऱ्या आठ हातगाड्यांवर फ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी जप्तीची कारवाई केली. दारू पिऊन ग्राहक पाटकर रस्त्यावरून येजा करणाऱ्या महिलांची छेड काढत होते. अनेक वर्ष हा प्रकार पाटकर रस्त्यावरील दारू विक्री दुकानासमोर सुरू होता. पाटकर रस्त्यावरील डिलक्स वाईन्स शॉप दुकानाचा मालक दारू विक्री करताना परवाना देतानाच्या अटीशर्तीचे पालन करत नाही. या दुकानाच्या परिसरात ग्राहक उघड्यावर दारू पिऊन कचरा करतात. सार्वजनिक स्वच्छतेचा भंग डिलक्स दुकानाचा मालक करत होता. साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी डिलक्स दारू दुकान बंद करण्याची नोटीस बजावली आहे. उत्पादन शुल्क विभागाला पत्र लिहून डिलक्स दुकानाचा दारू विक्रीचा परवाना रद्द करण्याचे कळविले आहे. देवीचापाडा येथे हनुमान मंदिर शेजारील भोईर सदनला लागून मच्छिंद्र चिमण पाटील उर्फ मच्या हा मागील तीन वर्षापासून घराच्या मोकळ्या जागेत विदेशी दारू बेकायदा विक्री करत होता. या अड्ड्यावर रास्त दरात विदेशी दारू मिळत असल्याने ग्राहकांची दिवस, रात्र गर्दी येथे असायची. परिसरातील रहिवासी दारूड्यांच्या त्रासाने हैराण होते. विष्णुनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार, पोलीस उपनिरीक्षक दीपविजय भवर यांच्या पथकाने मच्छिंद्रच्या अड्ड्यावर छापा टाकून दारू अड्डा उध्वस्त केला आणि दारूविक्रेत्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली. ग्राहक सेवेचे कोणतेही नियम न पाळता डिलक्स वाईन्स शॉपचा मालक दारू विक्री करतो. दुकान परिसरात अस्वच्छता, दारू बाटल्या पडल्या आहेत. त्यामुळे हे दुकान बंदची नोटीस आणि उत्पादन शुल्क विभागाला परवाना रद्द करावा असे कळविले आहे. भारत पवार, साहाय्यक आयुक्त, फ प्रभाग.

# रोखे विक्रीतून निधी उभारणी; एमएमआरडीएच्या तिजोरीत खडखडाट, ५० हजार कोटींच्या रोखे विक्रीला मंजुरी

**मुंबई :** मुंबई महानगर क्षेत्रात जवळपास एक लाख कोटींहून अधिक खर्चाचे प्रकल्प राबवत असलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) तिजोरीत मात्र खडखडाट आहे. कर्ज उभारणीनंतरही निधी अपुरा पडू लागल्याने आता बाजारात रोखे विक्री करून निधी उभारण्याची वेळ प्राधिकरणावर आली आहे. त्यानुसार ५० हजार कोटींच्या रोखे विक्रीच्या प्रस्तावाला शुक्रवारी प्राधिकरणाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशात एमएमआरडीएमार्फत मेट्रोसह अनेक पायाभूत सुविधा प्रकल्प राबविले जात आहेत. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर गेल्या



वर्षभरात प्राधिकरणामार्फत हजारो कोटींच्या कामांची घोषणा करण्यात आली असून अनेक प्रकल्प सुरूही करण्यात आले आहेत. कधी काळी श्रीमंत प्राधिकरण अशी ओळख असलेल्या एमएमआरडीएची तिजोरी या प्रकल्पांमुळे रिकामी झाली आहे. मात्र, राजकीय दबावामुळे प्रकल्पांच्या मंजुरीचा धडाका सुरूच आहे. अशा परिस्थितीत निधी उभारायचा कसा, असा प्रश्न एमएमआरडीएला पडला आहे. एमएमआरडीएकडे उत्पन्नाचा कोणताही मुख्य स्रोत नाही. भूखंड विक्रीतून प्राधिकरणाला महसूल मिळतो. मात्र, गेल्या काही वर्षांत वांद्रे–कुर्ला संकुल वा वडाळ्यातील भूखंडांची विक्री झालेली नाही. त्यामुळे उत्पन्नाचा ओघ आटला आहे. सध्या एमएमआरडीएच्या तिजोरीत ७० कोटी ७९ लाख रुपये इतकाच निधी आहे, तर हाती घेतलेल्या प्रकल्पांचा खर्च एक लाख कोटींहून जास्त आहे. महत्त्वाचे म्हणजे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आणखी काही प्रकल्प राज्य सरकारकडून एमएमआरडीएच्या माथी मारले जाण्याची शक्यता आहे. त्यासाठी निधी उभारणीकरिता एमएमआरडीएने ५० हजार कोटींच्या रोखे विक्रीचा प्रस्ताव शुक्रवारी प्राधिकरणाच्या बैठकीत मंजुरीसाठी ठेवला होता. या प्रस्तावास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिल्याची माहिती उच्चपदस्थ अधिकाऱ्याने दिली. हे रोखे पाच वर्षांच्या दीर्घ मुदतीसाठी असतील आणि त्यांना राज्य सरकारची हमी असेल.

# डोंबिवली, भिवंडीत गुटखा विक्री, हुक्का पार्लर चालविणाऱ्या मालकांवर गुन्हे

**डोंबिवली :** कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील शाळा, महाविद्यालय परिसरातील अनेक पान टपऱ्यांवर प्रतिबंधित गुटखा, गांजा, अफू, नशा येईल अशा वस्तू विकणाऱ्या विक्रेत्यांवर पालिकेने गेल्या आठवड्यापासून कारवाई सुरू केली आहे. अशाच प्रतिबंधित वस्तू विकणाऱ्या, तसेच हुक्का पार्लर चालवून नागरिकांच्या आरोग्यास, मालमत्तेस हानीकारक ठरणाऱ्या दोन विक्रेते, चालकांवर विष्णुनगर, कोन पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. डोंबिवली पश्चिमेतील पंडित दिनदयाळ रस्त्यावरील स्वामी विवेकानंद शाळेच्या समोर पानटक्का नावाने संदीप रामलखन कुमार (२०) हा पान,सिगारेट, तंबाखू विक्रीचे दुकान चालवितो. या दुकानात सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत तरूणांसह विविध वयोगटातील नागरिकांची गर्दी




असते. या गर्दीचे रहस्य अनेक नागरिकांना उलगडत नव्हते. केवळ पान खाण्यासाठी एवढी गर्दी जमू कशी शकते, असा नागरिकांचा प्रश्न होता. गेल्या आठवड्यात ह प्रभागाचे साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांनी पानटक्का दुकानावर अचानक छापा टाकला. त्यावेळी दुकानात अधिक प्रमाणात प्रतिबंधिक गुटख्याचा साठा, चॉकलेटच्या वेष्टनात नशा येणारी भुकटी पावडर आणि आरोग्याला हानीकारक नशेच्या वस्तू आढळून आल्या. मानवी जीवनास या सर्व वस्तू हानीकारक आहेत हे माहिती असुनही या वस्तू पानटक्का दुकानात ठेवल्याबद्दल साहाय्यक आयुक्त सावंत यांच्या आदेशावरून अधीक्षक अरूण पाटील यांनी पानटक्का दुकानाचे मालक संदीप कुमार याच्यावर भारतीय दंड विधान सिगारेट, तंबाखू उत्पादने, पुरवठा आणि वितरण कायद्याने विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला आहे. पानटक्का दुकानातील ग्राहक रस्त्यावर उभे राहत असल्याने शाळेत येणाऱ्या पालकांना विशेषता महिला वर्गाला सर्वाधिक त्रासदायक होती. अशाचप्रकारची गर्दी डोंबिवली एमआयडीसीत एम्स रुग्णालयासमोरील गल्लीत सकाळपासून रात्री उशिरापर्यंत असते. या भागात पोलिसांनी गस्त वाढविण्याची मागणी होत आहे. भिवंडी तालुक्यातील कोन गावात हुक्का पार्लर चालविणाऱ्या एका चालकासह त्याचे तीन कर्मचारी आणि पाच ग्राहकांविरुध्द कोन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोन गाव हद्दीतील स्ली रुप टॉप लॉन्ज हॉटेल, तिसरा माळा टोयाटो शोरुमच्या वर, कोनगाव, ता.भिवंडी येथे आरोपी धीरेन महेश साधवानी हा आपल्या तीन कर्मचाऱ्यांसह हुक्का पार्लर चालवित असल्याची माहिती कोन पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी या हुक्का पार्लरवर छापा टाकला. तेथे त्यांना तंबाखूजन्य हुक्का चालक वाधवानी ग्राहकांना पुरवित असल्याचे आढळले. तसेच तेथील कर्मचारी हातात एका झांझ्यामध्ये विस्तव घेऊन तो झारा ग्राहकांच्या समोर नेऊन त्यांना हुक्का सेवन करण्यासाठी साहाय्य करत होते. यावेळी झांझ्यातील ठिणग्या दुकानात उडून दुकातील फर्निचरला आग लागून मानवी जीवित धोक्यात येण्याची शक्यता होती.

# विरार रेल्वे स्थानकात थरार, रेल्वे पूलावर महिलेवर चाकूने प्राणघातक हल्ला

**वसई :** आरती यादव हत्या प्रकरण ताजे असतानाच विरारमध्ये अशाच प्रकारची घटना घडली आहे. विरार रेल्वे स्थानकाच्या पादचारी पूलावर २७ वर्षीय महिलेवर चाकूने प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. हा हल्ला तिच्या पतीने केला असून प्रवाशांच्या मदतीने त्याला पकडण्यात आले आहे. सध्या महिलेवर विरारच्या संजीवनी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. २७ वर्षीय महिला विरशीला कामावर जाण्यासाठी विरार रेल्वे स्थानकात आली होती. सकाळी ७ च्या सुमारास ती विरार स्थानकाच्या दक्षिण पूलावर (एफओबी) जात असताना मागून आलेल्या तिच्या पतीने तिच्यावर चाकूने वार केले. या हल्ल्यात ती गंभीर जखमी झाली. स्थानिक प्रवाशांच्या मदतीने रेल्वे सुरक्षा बलाच्या जवानांनी आरोपी शिव शर्मा याला ताब्यात घेतले. त्याला वसई रेल्वे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. जखमी महिलेवर विरारच्या संजीवनी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आम्ही याबाबत महिलेचा जबाब नोंदवून गुन्हा दाखल करू, असे रेल्वे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) तुंबडा याने सांगितले. मागील महिन्यात वसईत भर रस्त्यात आरती यादव या तरुणीची चाकूने वार करून हत्या करण्यात आली होती. पुन्हा तशाच प्रकारची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे.




# विरारमध्ये पोलिसाची गळफास घेऊन आत्महत्या

**वसई :** मुंबई पोलीस दलातील पोलीस हवालदार कैलास टेकवडे (४७) यांनी विरार येथील राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. ते विरार मधील घरात एकटेच रहात होते. दोन दिवसांपूर्वी त्यांनी आत्महत्या केली असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. कैलास टेकवडे हे मुंबई पोलिसांच्या मोटार परिवहन विभागात चालक म्हणून कार्यरत होते. २००० मध्ये ते पोलीस दलात रुजू झाले होते. टेकवडे हे विरार पश्चिमेच्या जकात नाका येथील गार्डन कोर्ट इमारतीत एकटे राहते होते. पत्नी आणि मुले त्यांच्यासोबत रहात नव्हते. कांदिवली येथे राहणारा कैलास यांचे बंधून विलास २ जुलै पासून भावाला संपर्क करत होते. मात्र कैलास यांच्याकडून प्रतिसाद नव्हता. त्यामुळे गुरूवारी त्यांनी आपल्या मित्राला विरारच्या घरी बघण्यासाठी पाठवले होते. परंतु दार बंद होते. त्यामुळे शेजाऱ्यांनी अर्नाळा सागरी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी दार तोडून आत प्रवेश केला असता कैलास टेकवडे यांचा मृतदेह हॉल मधील पंख्याला लटकलेल्या अवस्थेत मिळाला. त्यांनी आत्महत्येपूर्वी कुठलीही चिठ्ठी लिहिलेली नव्हती. मागील दोन दिवसांपूर्वी त्यांनी आत्महत्या केल्याची शक्यता आहे. टेकवडे यांचा मृतदेह शवविच्छेदनाच्या अहवालानंतर नेमकी वेळ स्पष्ट होईल असे पोलिसांनी सांगितले.




OWNER, PRINTER, PUBLISHER & EDITOR BY ANIL RAJARAM PAWAR PRINTED AT M/S SOMANI PRNITING PRESS, UNIT NO.04, GROUND FLOOR, N.K. INDUSTRIAL ESTATE, OFF AREY ROAD, NEAR PARVASI IND. ESTATE, GATE NO. 2, GOREGAON EAST, MUMBAI-400063, & PUBLISH AT M/81, MARIAMMA NAGAR, WORLI, DR A.B. ROAD,BEHIND NEHRU CENTRE, WORLI MUMBAI - 400018. MAHARASHTRA , Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789 , Mob. 9867110318

मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक अनिल राजाराम पवार यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.४, ग्राउंड फ्लोअर, आरे रोड, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेट, गेट नं. २, गोरेगाव (पूर्व) मुंबई - ४०००६३ महाराष्ट्र येथून मुद्रित, एम/८१,मरिम्मा नगरए वरळी, डॉ. ए.बी. रस्ता, नेहरु सेंटरच्या मागे, वरळी,मुंबई ४०००१८, महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. मो. ९८६७११०३१८, Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789